## गरवारे हाय-टेक फिल्म लिमिटेडकडून विषारी पाणी व वायू प्रदूषणाचा कहर



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नागरिकांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष


www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -19, अंक-16 ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. सोमवार, 22 डिसेंबर 2025 ■ किंमत 2 रूपये, पाने -4


### फुलंब्रीत मा. राज्यपाल हरिभाऊ बागडे, आमदार चव्हाण यांचे निकटवर्तीय सुहास शिरसाठ यांचा दारूण पराभव

# फुलंब्रीत घासून नाही रे..... ठासून आला- आपला राजूभाऊ



## पानवाडीत हिरवा व लाल गुलालासह जल्लोष

## फुलंब्री नगरपंचायत निवडणूक : महाविकास आघाडीचे राजेंद्र ठोंबरे नगराध्यक्षपदी, १,७९७ मतांनी दणदणीत विजय

दिनेश परदेशी, छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

फुलंब्री नगरपंचायत निवडणुकीत यंदा मतदारांनी स्पष्ट कौल देत महाविकास आघाडीच्या उमेदवार राजेंद्र ठोंबरे यांच्या पारड्यात विजय घातला आहे. नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या थेट आणि चुरशीच्या लढतीत राजेंद्र ठोंबरे यांनी भाजपचे उमेदवार सुहास शिरसाठ यांचा तब्बल १,७९७ मतांनी पराभव करत दणदणीत विजय मिळवला आहे. आमदार अनुराधाताई चव्हाण यांचा प्रभाव मात्र येथील जनतेवर पडलेला नाही. आत्मपरिक्षण करण्याची गरज असल्याचे आता बोलले जात आहे.

या निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले होते. प्रचारादरम्यान दोन्ही उमेदवारांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, विकासकामांचा मुद्दा, स्थानिक प्रश्नांची जाण आणि जनतेशी असलेला थेट संपर्क यामुळे मतदारांनी ठोंबरे यांना स्पष्ट बहुमत दिल्याचे निकालातून दिसून आले.

निकाल लागताच नगराध्यक्ष राजेंद्र ठोंबरे यांचा दाखवा ताफा पानवाडी या गावाकडे वळाला व येथे नागरिकांनी राजेंद्र ठोंबरे यांचे जोरदार स्वागत केले. येथे मुस्लिम मतदारांचे वर्चस्व आहे इथले मतदान हे निर्णयकच होते येथील मतदारांच्या हातातच कोणाला विजयी करायची व कोणाला पराभूत करायचे हे गणित होते. येथील मतदारांची मर्जी जिंकण्यात राजेंद्र ठोंबरे यशस्वी झाले व मतदारांनी त्यांच्या गळ्यात विजयाची माळ घातली.

विजयानंतर बोलताना नवनिर्वाचित नगराध्यक्ष राजेंद्र ठोंबरे यांनी फुलंब्रीकर जनतेचे आभार मानले. जनतेने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याला पात्र ठरण्यासाठी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करेन. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, शिक्षण आणि मूलभूत सुविधा या प्रश्नांना प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी सांगितले.

निकाल जाहीर होताच फुलंब्री शहरात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी आणि समर्थकांनी जल्लोष केला. फटाके फोडून, मिठाई वाटून आणि घोषणा देत विजयाचा आनंद साजरा करण्यात आला. या विजयानंतर फुलंब्री नगरपंचायतीवर महाविकास आघाडीचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. विजयानंतर बोलताना नवनिर्वाचित नगराध्यक्ष राजेंद्र ठोंबरे यांनी फुलंब्रीकर जनतेचे आभार मानले. जनतेने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याला पात्र ठरण्यासाठी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करेन असे राजेंद्र ठोंबरे म्हणाले. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, शिक्षण आणि मूलभूत सुविधा या प्रश्नांना प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी सांगितले. या निवडणुकीतील निकालामुळे आगामी राजकीय समीकरणांवरही परिणाम होण्याची शक्यता असून, फुलंब्रीच्या राजकारणात हा निकाल महत्त्वाचा मानला जात आहे.

महाविकास आघाडीच्या वतीने अरशिया रिजवान पठाण, हलिमाबी मजीद कुरेशी, जमीर सगीर पठाण, हिना मुद्दस्सर पटेल, जावेद याकूब पठाण, मसरत जफर चिश्ती, सुशमेश राजू प्रधान, अर्चना उमेश दुतोडे, राणी पवन घोडके, प्रशांत राजेंद्र नागरे, सना कौसर उमर, शहा अनोबी हे उमेदवार विजयी झाले आहेत. तर भारतीय जनता पक्षालाही काही प्रभागांमध्ये यश मिळाले असून द्वारका संतोष जाधव, वाल्मिक लक्ष्मण जाधव, गणेश राऊत, देविदास ढगारे आणि योगेश मधुकर मिसाळ या उमेदवारांनी विजय संपादन केला आहे.

## जनतेचा विजय - नवनिर्वाचित नगरसेवक प्रशांत नागरे



फुलंब्री नगरपरिषद निवडणुकीत महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार नवनिर्वाचित नगरसेवक प्रशांत नागरे यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमदवार गजानन नागरे यांचा ३३९ मतांनी पराभव करत जोरदार विजय मिळवला. विजयी मिरवणुकीत त्यांच्या समर्थकांनी महाविकास आघाडीचा विजयाचा जल्लोष केला. प्रशांत नागरे अंगार है... बाकी सब भंगार है... अशा घोषणा समर्थकांनी केल्या. विजयानंतर बोलताना नवनिर्वाचित नगरसेवक प्रशांत नागरे यांनी फुलंब्रीकर जनतेचे आभार मानले. जनतेने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याला पात्र ठरण्यासाठी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करेन. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, शिक्षण आणि मूलभूत सुविधा या प्रश्नांना प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी सांगितले. प्रशांत नागरे वडील राजेंद्र नागरे म्हणाले की, ही निवडणूक जनतेने हाती घेतली होती त्यामुळे सत्ताधाऱ्यांना पळता भुई थोडी झाली आणि येथील जनतेने त्यांना धडा शिकवला आहे त्यामुळे मी संपूर्ण जनतेचे मनापासून आभार मानतो.

## मी जनतेचे उपकार विसरू कधीच शकणार नाही - नवनिर्वाचित नगरसेविका राणी घोडके



शिवसेना (उबाठा)पक्षाचे राणी घोडके यांनी ४०२ मते घेतली त्यांनी शारदा शेरकर यांना २५ मतांनी पराभूत करत विजय मिळवला. यावेळी पवन घोडके व राणी घोडके यांना आमच्या प्रतिनिधी विजयाची प्रतिक्रिया विचारल्यावर ते म्हणाले की, हा आमचा विजय नसून प्रभाग क्र. १३ मधील मायबाप जनतेचा विजय आहे. आमच्या सर्व सहकाऱ्यांचा हा विजय आहे. जे आमच्या खांद्याला खांदा लावून रात्रंदिवस डोअर टू डोअर फिरले. सर्व मतदारांचे आम्ही मनापासून धन्यवाद मानतो. आम्ही कोण काय म्हणाले, कोणी आमच्यावर काय आरोप केले याच्यात न पडता विकास कसा करता येईल. याकडे लक्ष देवुन व नागरिकांनी जो विश्वास आमच्यावर दाखवला आहे. त्यावर आम्ही खरे उतरू.शेतकऱ्यांच्या व नागरिकांचे प्रश्न याआगोदर ही आम्ही सोडवल्या आहेत. आता आम्ही सत्तेत असणार आहोत. विकासाचा प्रश्न येत नाही. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करेन. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, शिक्षण आणि मूलभूत सुविधा या प्रश्नांना प्राधान्य दिले जाईल, असेही पवन घोडके व राणी घोडके यांनी सांगितले.




## खुलताबाद नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी काँग्रेसचे आमेर पटेल

दिनेश परदेशी- अट्टल मत प्रतिनिधी

खुलताबाद : नगर परिषद निवडणुकीत नगराध्यक्षपदी काँग्रेसचे उमेदवार सय्यद आमेर पटेल यांनी भाजपच्या परसराम बारगळ यांचा १ हजार २१३ मतांनी पराभव करून पुन्हा एकदा नगर परिषद ताब्यात ठेवण्यात यश मिळवले. नगर परिषद ताब्यात घेण्यासाठी भाजप आ. प्रशांत बंब, राष्ट्रवादीचे आ. सतीश चव्हाण यांनी फिल्डींग लावली होती. परंतु मतदारांनी दोन्ही आमदारांना बाजूला सारत काँग्रेसच्या उमेदवारावर विश्वास दाखवत सत्ता ताब्यात दिली. खुलताबाद शहरात अट्टलमत प्रतिनिधींनी फेरफटका मारला असता त्यांना नागरिकांनी आमेर पटेल यांच्याबाबत भरभरून कौतुक केले. ते म्हणाले की, कोणतेही काम असून आमेर आमच्यासाठी उभा असतो. पैसा काय करायचा आहे. परंतु जीवाभावाचा आमचा आमेर आमच्यासाठी खूप काही आहे. धनशक्ती विरूद्ध जनशक्तीचा विजय असल्याचे नागरिकांनी सांगितले. नवनिर्वाचित नगराध्यक्ष आमेर पटेल हे म्हणाले की, हा माझा विजय नसून जनतेचा विजय आहे. मी फक्त काम करत राहिलो. आणि जनतेने मला त्यांचे हे रिटर्न गिफ्ट दिले. मी त्यांचा मनापासून धन्यवाद मानतो.

## राजेंद्र ठोंबरे यांना विजयी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगरचे कट्टर शिवसैनिकांनी फुलंब्रीत डोअर टू डोअर प्रचार केला



छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)

राजेंद्र ठोंबरे यांना नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजयश्री प्राप्त व्हावी यासाठी छत्रपती संभाजीनगरचे कट्टर शिवसैनिक यांच्या बेंद्रे शिवसेना बेंद्रे या नावाने ओळखल जाते. असे बेंद्रे आप्पा व त्यांची सहकारी मुरदळे पाटील, राजेंद्र कालमेघ, सखाराम दुबे, दिलीप पदमार आदी शिवसैनिकांनी ही प्रयत्न केले. विजयश्री मिळताच संभाजीनगरहून नवनिर्वाचित नगराध्यक्षांना भेटण्यासाठी व त्यांना शुभेच्छा देण्यासाठी फुलंब्रीत आले होते. भाजपला फोडाफोडीचे राजकारण जड जाईल, आम्ही मात्र बाळासाहेब ठाकरे यांचे कळवट शिवसैनिक आहोत. असे 'अट्टल मत'शी त्यांनी संवाद साधताना बेंद्रे अप्पा यांनी सांगितले.

# लढा मराठीचा व मराठी शाळा टिकवण्याचा

मराठी शाळांबाबत सकारात्मक विचार करणाऱ्यांनी आपल्या मुलांना, नातवंडांना मराठी शाळांमध्ये शिकवण्याचा आग्रह धरा. जर का आंदोलने उभी राहिली तर मराठी शाळांची जी सध्या पाडकामे सुरू आहेत ती थांबवली जाऊ शकतात. तसेच त्या ठिकाणी शाळेऐवजी इतर काही उद्योग सुरू करण्याचा मानस असेल, तर तो रोखला जाऊ शकतो. कारण या नव्याने उभारलेल्या इमारतीत मराठी शाळाच सुरू राहतील याबाबत कोणती खात्री सध्या देता येत नाही. त्यासाठी त्या शाळेत मुले शिकणे आवश्यक आहे. मराठी शाळांच्या इमारतींच्या जागी पुनर्बांधणीनंतर फक्त शाळा एके शाळाच भरावी यासाठी सर्वांनी आज पालिका प्रशासनावर जोर दिला पाहिजे किंवा तसा एक जनरेटाच उभा राहिला पाहिजे.

मुंबईत व राज्यभरात बंद पडत चाललेल्या मराठी शाळांबाबत नुकत्याच मुंबई महापालिकेवर काढलेल्या एका मोर्चामुळे सर्वांचेच लक्ष वेधले. आज परिस्थिती अशी आहे, की आज कोणालाही मराठी शाळेत घालणे संयुक्तिक वाटत नाही. आज सर्वांना आपली मुले इंग्रजी शाळेत शिकून देश परदेशात जावी असेच वाटते. त्यासाठी इंग्रजी भाषा येणे खूप महत्त्वाचे वाटते. त्यामुळे पालकांच्या अपुऱ्या राहिलेल्या इच्छा ते आपल्या मुलांवर लादतात व बालवयातच मुलांना इंग्रजी भाषेचे डोक्यावर ओझे घेऊन आपल्या शालेय जीवनाची सुरुवात करावी लागते. यात बरेच मुद्दे आहेत मात्र जर एखाद्या पालकाला मराठी शाळेत घालायचं असेल तर, त्यांच्याकडे काही पर्याय आहेत का? कारण आज राज्यभरात अथवा मुंबईत मराठी शाळा एकामागोमाग एक बंद पडत चाललेल्या आहेत. त्यात प्रत्येक भागातील मराठी शाळा या ठरवून बंद तर पाडल्या जात नाहीत ना, असा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे. मुंबईतही सर्वच चांगल्या मराठी शाळा होत्या व आहेत मात्र त्याचे हळूहळू रूपांतर आता इंग्रजी शाळेत होत चालले आहे. त्यामुळे इतर नाही तरी निदान मुंबई महानगरपालिकेच्या शाळा तरी टिकाव्यात अशी भाबडी आशा सर्वांनाच आहे. मात्र आता मुंबई महापालिका आपल्या काही शाळांचे हळूहळू रूपांतर इंग्रजी शाळेत करत आहेत. आज याच मराठी शाळा बंद विरोधात सर्व मराठीजणांनी एकत्र येण्याची गरज व्यक्त केली आहे. यासाठी थेट मुंबई महानगरपालिकेवरच मोर्चा काढण्याचा निर्णय मराठी शाळाबाबतच्या परिषदेदरम्यान मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष डॉ. दीपक पवार यांनी घेतला. मात्र या मोर्चातून त्यांच्या हाती सध्या तरी काही लागले नाही. कारण सध्या सुरू असलेली आचारसंहिता त्यांच्या आड आली. त्यामुळे पालिका आयुक्तांकडूनही त्यांना ठोस असे आश्वासन मिळाले नाही, मात्र तरीही ही मराठी शाळा वाचवण्यासाठी धडपड आपल्याला कृतिशील कार्यक्रमासोबतच आंदोलनातूनही येणाऱ्या काळात करावीच लागणार आहे. कारण हा विषयच आता मोठा चिंतनशील होत चालला आहे. मराठी शाळा व मराठी भाषा वाचवण्यासाठी आंदोलने होतच राहतील पण त्याचबरोबर कृतिशील कार्यक्रम होणे ही गरजेचे आहे. त्यासाठी मराठी शाळांबाबत सकारात्मक विचार करणाऱ्यांनी आपल्या मुलांना, नातवंडांना मराठी शाळांमध्ये शिकवण्याचा आग्रह धरला पाहिजे. जर का आंदोलने उभी राहिली, तर मराठी शाळांचे जी सध्या पाडकामे सुरू आहेत ती थांबवली जाऊ शकतात. तसेच त्या ठिकाणी शाळेऐवजी इतर काही उद्योग सुरू करण्याचा मानस असेल तर तो रोखला जाऊ शकतो. कारण या नव्याने उभारलेल्या इमारतीत मराठी शाळाच सुरू राहतील याबाबत कोणती खात्री सध्या देता येत नाही त्यासाठी त्या शाळेत मुले शिकणे आवश्यक आहे. मराठी शाळांच्या इमारतींच्या जागी पुनर्बांधणी नंतर फक्त शाळा एके शाळाच भरावी यासाठी सर्वांनी आज पालिका प्रशासनावर जोर दिला पाहिजे किंवा तसा एक जनरेटाच उभा राहिला पाहिजे.

मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांची एकूण संख्या साधारण पाच-सहा वर्षांपूर्वी १ हजार १४६ होती. मात्र आज ती संख्या १ हजार ११८ झाली आहे. म्हणजेच मागील पाच वर्षांत २८ शाळा कमी झाल्या. त्यात सर्वाधिक १७ शाळा मराठी माध्यम ाच्या आहेत, तर हिंदी, उर्दू शाळांमध्ये प्रत्येकी सहा शाळा कमी झाल्या. सद्यस्थितीत हिंदी माध्यमाच्या २१६, उर्दू माध्यमाच्या १८६ शाळेत विद्यार्थी शिकत आहेत. मात्र त्याच दरम्यान विद्यार्थी कमी होत असतानाही इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मात्र सहा ते सात शाळांची वाढ झाली आहे. २०१४-१५ साली मुंबई महानगरपालिका मराठी माध्यमांच्या ३६८ शाळा चालवत होती. तर आता ही संख्या २५४ इतकी झाली आहे. विविध कारणांमुळे महानगरपालिकेच्या शाळा बंद पडण्याचे सत्र सुरू असून गेल्या तीन वर्षांत सर्वाधिक १७ मराठी शाळा बंद पडल्या आहेत. काही शाळेच्या इमारती अतिधोकादायक असल्याचे पालिकेने घोषित केले आहे. त्यात शाळेचे तोडकाम करण्यात येत आहे. त्यामुळे तोडलेले शाळेच्या इमारतीची पुनर्बांधणी करण्याऐवजी ती शाळा तोडण्याचा घाट पालिकेने सुरू केल्याचा आरोपही आता संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे. मराठी शाळा आणि अंगणवाड्या टिकल्या नाही, तर मातृभाषेतील शिक्षण धोक्यात येणार आहे. मराठी शाळा वाचवण्यासाठी केवळ घोषणाबाजी आणि भावनिक आंदोलन पुरेसे नाही. मराठीच्या भवितव्यासाठी खऱ्या अर्थाने कृतिशील कार्यक्रम राबवावाच लागेल आणि त्याची सुरुवात प्रत्येकाने आपल्या घरापासून केली पाहिजे. मराठी शाळांचे बंद होणे, इमारती पाडणे, खासगीकरण आणि माध्यमांवर ठोस चर्चा आता झालीच पाहिजे. ठरवून बंद पाडलेल्या, पाडल्या जाणाऱ्या शाळा यावर गंभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

# महाराष्ट्र धर्म : मानवता आणि विवेकाची परंपरा!

**महाराष्ट्र** धर्म ही संकल्पना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि वैचारिक परंपरेचा एक अत्यंत समृद्ध, प्रेरणादायी आणि व्यापक वारसा आहे. ही संकल्पना कोणत्याही एका धार्मिक पंथाशी स्पर्धा करणारी किंवा विरोध करणारी नसून, विविध श्रद्धा, विचारधारा आणि जीवनदृष्टी यांना एकत्र आणणारी आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात संतपरंपरा, लोककल्याणकारी राज्यकारण आणि समाजसुधारणेची परंपरा यांचा जो सुंदर संगम झाला, त्यातून महाराष्ट्र धर्म आकाराला आला. या विचारधारेचा केंद्रबिंदू कोणतीही श्रद्धा नाकारणे हा नसून, माणूस, समाज आणि मानवता या मूल्यांना सर्वोच्च स्थान देणे हा आहे.



-डॉ. भारत कराड
प्राचार्य, सामाजिक व राजकीय विश्लेषक

महाराष्ट्र धर्माची मुळे संत परंपरेत खोलवर रुजलेली आहेत. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून धर्माला सामान्य माणसाच्या जीवनाशी जोडले. त्यांच्या विचारांमध्ये श्रद्धा आणि विवेक यांचा समन्वय दिसून येतो. ङ्गअवघे विश्वचि माझे घरङ्घ ही भूमिका सर्वसमावेशकतेचे आणि बंधुतेचे प्रतीक आहे. संत नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांनी सम ाजातील विसंगतींवर भाष्य करताना कोणालाही दुखावण्याचा हेतू न ठेवता, माणुसकी, करुणा आणि समतेचा आग्रह धरला. तुकारामांच्या अभंगांमध्ये धर्म म्हणजे माणसाच्या दुःखाशी एकरूप होणे, अन्याय कमी करण्याचा प्रयत्न करणे आणि जीवन अधिक सुसंस्कृत बनवणे, असा सकारात्मक अर्थ दिसून येतो.

या वैचारिक परंपरेचा पुढील टप्पा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारणात दिसतो. शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे केवळ राजकीय यश नव्हते, तर लोककल्याण, न्याय आणि सर्वधर्मसमभाव यांवर आधारित राज्यव्यवस्थेचे उदाहरण होते. त्यांच्या कारभारात धर्माचा अर्थ कोणत्याही एका श्रद्धेला प्राधान्य देणे नव्हता, तर सर्व प्रजेला सुरक्षितता, न्याय आणि सन्मान मिळावा हा होता. स्त्रियांचा सन्मान, धार्मिक स्थळांचे संरक्षण, शेतकऱ्यांच्या हिताची काळजी आणि प्रशासनातील शिस्त या बाबी महाराष्ट्र धर्माच्या राजकीय आणि प्रशासकीय स्वरूपाचे दर्शन घडवतात.

कालांतराने महाराष्ट्र धर्माला सम ाजसुधारणेची अधिक स्पष्ट दिशा मिळाली. महात्मा ज्योतिबा फ ुले यांनी शिक्षण, समता आणि स्वाभिमान यांना केंद्रस्थानी ठेवून समाजाला आत्मपरीक्षणाची संधी दिली. त्यांचा उद्देश कोणाच्या श्रद्धेला दुखावणे नव्हता, तर समाजातील दुर्बल घटकांना संधी मिळावी हा होता. राजर्षी शाहू महाराजांनी या विचारांना प्रत्यक्ष कृतीचे रूप दिले. शिक्षणाचा प्रसार, सामाजिक समता आणि सर्वांना समान संधी मिळाव्यात यासाठी त्यांनी घेतलेले निर्णय महाराष्ट्र धर्माच्या व्यवहार्य अंमलबजावणीचे उदाहरण ठरतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्र धर्माला वैचारिक स्पष्टता आणि घटनात्मक अधिष्ठान दिले. त्यांच्यासाठी धर्म म्हणजे माणसाला सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारी सामाजिक व्यवस्था होती. त्यांनी मांडलेली समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्ये भारतीय राज्यघटनेत स्थान मिळवून समाजाच्या सर्व घटकांसाठी मार्गदर्शक ठरली. येथे महाराष्ट्र धर्माचा आधुनिक आणि सर्वसमावेशक अवतार दिसून येतो.

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र धर्म अधिक व्यापक अर्थाने पुढे आला. भारतीय राज्यघटनेने व्यक्तिस्वातंत्र्य, समानता आणि सामाजिक न्याय यांना कायदेशीर स्वरूप दिले. या मूल्यांचा उद्देश कोणत्याही परंपरेचा अवमान करणे नसून, समाज अधिक समतोल, सुसंस्कृत आणि न्याय्य बनवणे हा आहे. त्यामुळे महाराष्ट्र धर्म हा परंपरा आणि आधुनिकता यांचा सुंदर समन्वय ठरतो. महाराष्ट्र धर्माचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे विवेकवाद. विज्ञाननिष्ठ विचार, प्रश्न विचारण्याची मोकळीक आणि अंधश्रद्धांपासून मुक्ती यांचा आग्रह हा समाजाला अधिक सक्षम बनवण्याच्या उद्देशातूनच पुढे आला. या विचारप्रवाहाचा हेतू श्रद्धा नाकारणे नव्हे, तर श्रद्धेला विवेकाची साथ देणे हा आहे. त्यामुळे महाराष्ट्र धर्म हा संघर्षाचा नव्हे, तर समजून घेण्याचा आणि संवादाचा मार्ग दाखवतो.

महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्र धर्म कधीही द्वेष, हिंसा किंवा बहिष्कार शिकवत नाही. तो कुणाला कमी लेखत नाही, कुणाच्या श्रद्धेवर आघात करत नाही आणि समाजात फूट पाडण्याऐवजी सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. विविधता हीच महाराष्ट्राची ताकद आहे, ही भूमिका महाराष्ट्र धर्माच्या केंद्रस्थानी आहे. आजच्या वेगाने बदलणाऱ्या आणि अनेकदा अस्थिर वाटणाऱ्या सामाजिक वातावरणात महाराष्ट्र धर्म अधिकच महत्त्वाचा ठरतो. तो आपल्याला सांगतो की समाज मजबूत व्हायचा असेल, तर समता, संवाद, सहअस्तित्व आणि मानवता या मूल्यांना प्राधान्य द्यावे लागते. संतांच्या विचारांतून, शिवाजी महाराजांच्या राज्यकारणातून, फुले-शाहू-आंबेडकरांच्या समाजसुधारणेतून आणि भारतीय संविधानातून विकसित झालेली ही परंपरा आजही मार्गदर्शक आहे. अखेरीस असे म्हणता येईल की महाराष्ट्र धर्म हा कोणाच्या विरोधात उभा असलेला विचार नसून, सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची प्रेरणा देणारा विचार आहे. जो माणसाला माणूस म्हणून सन्मान देतो, समाजात समतेचा भाव वाढवतो आणि विवेकाला महत्त्व देतोङ्गतोच खरा महाराष्ट्र धर्म आहे.

# प्रशासन हे सुशासन करण्यात ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांचे मोलाचे योगदान - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. प्रशासन हे पारदर्शक आणि लोकाभिमुख करून ते सुशासन करण्यासाठी संवाद कौशल्य आणि तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले. कन्नड येथील डीडीएल लॉनवर ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांचे एक दिवसीय उपविभागीय स्तरावरील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी सेवा हमी आयुक्त श्री किरण जाधव,कन्नड उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, मार्गदर्शक सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी संजय कुंडेटकर ,खुलताबाद तहसीलदार स्वरूप कंकाळ, डॉ.शोएब मोहम्मद डॉ.उल्फत परदेसी, डॉ. मेघा शेवगण तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते.

शासनाच्या प्रशिक्षण धोरण अंतर्गत सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन अध्यायवत व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना विविध सेवा सुविधा पारदर्शक, वेळेत आणि दर्जे दार उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रशिक्षित केले जात आहे. महाराष्ट्र राज्य प्रशासकीय यंत्रणेत ग्रामीण स्तरावर महसूल विभागाची भूमिका म हत्वाची आहे. यामध्ये ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) आणि मंडळ अधिकारी (सर्कल ऑफिसर) हे दोन दुवे थेट जनतेशी जोडलेले असून, त्यांना 'प्रशासनाचा कणा' म्हणून ओळखले जाते. शेतीविषयक नोंदींपासून ते विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीपर्यंत या अधिकाऱ्यांवर मोठी जबाबदारी असते. ही जबाबदारी पार पडत असताना दैनंदिन जीवनात शेतकरी बांधव, विविध प्रकारच्या नागरिक, महिला, कामानिमित्त संपर्क येत असतो तर हा संपर्क होत असताना नागरिकांच्या शंका समाधान आणि त्यांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी संवाद कौशल्य महत्वपूर्ण असून अंतरिक तळमळीने ग्रामीण जनतेला मार्गदर्शन आणि विविध शासकीय योजनेचा लाभ देण्यासाठी काम करावे.

यासाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्याचा अंगीकार करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम ाचे आयोजन केले आहे. या प्रशिक्षणातून अद्यावतंत्रज्ञानाचा वापर, विविध शासन निर्णय, नियमावली याचा अभ्यासही असणे आवश्यक आहे. तरच नागरिकांना आपण वेळेत सुविधा देऊ शकतो असे मार्गदर्शनात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले. प्रशिक्षणातील मार्गदर्शक संजय कुंडेटकर यांनी महसूल विषयक विविध कायद्याचे मार्गदर्शन केले यामध्ये जमीन महसूल अधिनियम १९६६ यामधील खंड दोन, तीन आणि चार यामधील असणाऱ्या विविध बाबीचे सखोल मार्गदर्शन केले. तसेच वारसा हक्क, कायदे तुकडे बंदी, व यातील सुधारणा यावर मार्गदर्शन केले .

सेवा हमी विधेयक याबाबत सेवा हमी आयुक्त किरण जाधव यांनी नागरिकांना सेवा वेळेत उपलब्ध करून देण्याची विहित कालावधी होण्याच्या आत उपलब्ध करून देण्याबाबत मार्गदर्शन केले तसेच सेवा हमी विधेयकाच्या अंतर्गत होणाऱ्या अपील व अपील होऊ नये या संदर्भात महसूल अधिकारी यांना मार्गदर्शन केले. डॉ. शोएब मोहम्मद डॉ. उल्फत परदेसी व मेघा सेवगन यांनी कर्मचाऱ्यांना आरोग्य विषयीचे मार्गदर्शन करून ताण-तणवाचे व्यवस्थापन करत असताना आपल्या आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे .याबाबत मार्गदर्शन करून आरोग्य विषयक विविध योजनांची माहिती या कार्यक्रमात दिली. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष गोरड उपविभागीय अधिकारी यांनी केले.

# चंद्रसागर धर्मशाळेचे कार्य प्रशासनीय संजय पापडीवाल



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

चंद्रसागर धर्मशाळेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच १४/१२/२५ रोजी शहागंज येथे संपन्न झाली. सभेच्या अध्यक्ष स्थानी भारत वर्षीय तीर्थरक्षा कमिटीचे उपाध्यक्ष संजय पापडीवाल यांच्या अध्यक्षते खाली सभा संपन्न झाली. सर्वप्रथम सभेची सुरवात राजकुमार पांडे व यातीन ठोळे यांच्या मंगलाचरण ने करण्यात आली.

यावेळी सभेचे प्रस्थाविक सेक्रेटरी श्रेणिक कासलीवाल यांनी केले ,तर सूत्र संचालन यतीन ठोळे यांनी केले. यावेळी भ.शांतीनाथ व आचार्य कल्प चंद्रसागर महाराज यांच्या फोटोस पुष्प अर्पण करण्यात आले. तसेच सभेचे दीप प्रज्वलन करण्यात आले यावेळी सभेचे अध्यक्ष संजय पापडीवाल पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी , पंचायत सचिव प्रकाश अजमेरा ,संस्थेचे सेक्रेटरी श्रेणिक कासलीवाल ,राजकुमार पांडे ,अनिल ठोळे ,प्रसाद पाटनी ललित लोहाडे, पारस अजमेरा, आशिष कासलीवाल ,सुरेंद्र पाटणी यांच्या सह सभासदांची उपस्थिती होती . यावेळी माघील प्रोसिडिंग चे वाचन ललित लोहाडे यांनी केले तर २०२४-२५ च्या अहवाल वाचन सेक्रेटरी श्रेणिक कासलीवाल यांनी केले. यावेळी साधुसंत व संस्थापकीय सदस्य तसेच दिगवंत महानुभाव यांना श्रद्धांजली देण्यात आली. तसेच सभेचे अध्यक्ष यांनी सांगितले कि चंद्रसागर धर्मशाळेचे कार्य प्रशासनीय आहे येथे बाहेर गावाच्या यात्रेकरू साठी उच्च प्रतीचे रूम आहे, तसेच या संस्थेत नेहमीच सामाजिक व जनकल्याण करी उपक्रम राबले जातात. तसेच संस्थेचे सेक्रेटरी श्रेणिक कासलीवाल यांनी संस्थेत चालू असलेल्या विविध कार्याची माहिती दिली त्यात सांगितले कि येणाऱ्या यातेकरू करिता व समाज बांधवान करिता अत्याधुनिक भोजन शाळा निर्माण कार्य सुरु आहे व रूमचे नूतनी कारण होणार आहे या सर्व कार्याला सर्व सभासदांनी एक मुखाने मंजुरी आली. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रसाद पाटणी यांनी केले सभा यशस्वी करनासाठी व्यवस्थापक प्रशांत लव्हाडे याचे सहकार्य मिळाला.

# पारदर्शक प्रशासनासाठी दस्तऐवजावर क्यू आर कोड आणि युनिक आयडी -जिल्हा प्रशासनाचा अभिनव उपक्रम

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

जिल्हा प्रशासनाने सुशासन सप्ताह अभियानांतर्गत विकसित केलेली दस्तऐवज पडताळणी (ऊेर्लीशपीं तशीळषळलरींळेप) सुविधा ही एक सुरक्षित व तंत्रज्ञानाधारित प्रणाली आहे. हा उपक्रम जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर दिलीप स्वामी यांच्या पुढाकारातून राबविण्यात आला आहे.

या प्रणालीमध्ये शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी णीशी खऊ व झर्ीीीव आधारित सुरक्षित लॉगिनची सुविधा उपलब्ध आहे. संबंधित शासकीय अधिकारी लॉगिन करून निर्गमित होणाऱ्या दस्तऐवजांना युनिक आयडी (णपळीिंश खऊ) व टठ कोड मॅप करतात. हा युनिक आयडी व टठ कोड त्या दस्तऐवजाची ओळख व सत्यता सुनिश्चित करतो.

नागरिक तसेच इतर शासकीय कार्यालये हीींिः//िंशीळषू.वालीप.लो/ या पोर्टलवर दस्तऐवजावरील टठ कोड स्कॅन करून किंवा युनिक आयडी प्रविष्ट करून संबंधित दस्तऐवजाची त्वरित पडताळणी करू शकतात. यामुळे तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयातून निर्गमित होणाऱ्या विविध आदेश, प्रमाणपत्रे व इतर शासकीय दस्तऐवजांची खात्रीशीर तपासणी सुलभ होते.

ही सुविधा नागरिक व शासकीय कार्यालयांना वेळेत व अचूक दस्तऐवज पडताळणी करण्यास मदत करते. बनावट, फेरफार केलेले किंवा संपादित (एवळींरलश्रश) दस्तऐवज ओळखून त्यापासून होणारे गैरप्रकार, फसवणूक व पुढील कायदेशीर अडचणी टाळण्यासाठी ही प्रणाली प्रभावी ठरत असून, प्रशासनातील पारदर्शकता, विश्वासार्हता आणि कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होत आहे. जिल्हा प्रशासन अंतर्गत होणाऱ्या महसूल आणि इतर विभागाअंतर्गत होणारा पत्रव्यवहार तसेच यातून विविध कागदपत्रे प्रमाणपत्रे नागरिकांना वितरित केले जातात हे वितरित करत असताना त्याचे प्रमाणिकीकरण ओळखण्यासाठी क्यू आर कोड द्वारे वेगळी ओळख कायमस्वरूपी देण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांना हे कागदपत्र कोठेही आणि कधीही संबंधित कागदपत्राचा क्यू आर कोड स्कॅन करून पाहता येणार आहे.

ही सुविधा निवासी उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित करण्यात आली असून, याचे डिझाइन व विकास प्रकल्प व्यवस्थापक, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी केले आहे.

# मुलींना हवा ‘अनुरूप’, मुलांना ‘सुस्वभावी’; सकल दिगंबर जैन वधू-वर परिचय मेळावा



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

लग्नासाठी जोडीदार निवडताना तरुणी आणि तरुणांच्या पसंतीतला स्पष्ट फरक सकल दिगंबर जैन समाज आयोजित वधू-वर परिचय मेळाव्यात प्रकर्षाने जाणवला. आधुनिकतेच्या धावत्या युगातही मुली 'अनुरूप' आणि स्वतःच्या स्वभावाशी जुळर्णाया, उच्चशिक्षित, आर्थिक सुस्थितीतील साथीदाराला प्राधान्य देत असल्याचे दिसले. तर दुसरीकडे तरुणांना सुस्वभावी, समंजस आणि कुटुंबवत्सल जोडीदार हवी असल्याचे दिसून आले. एवढेच नव्हे तर काही मुलींनी भावी साथीदार शहरातीलच पाहिजे, यावर जोर दिला. तरुणांनी साथीदार ग्रामीण भागातील असेल तरी चालेल, असे म्हटले.

आर्यानंदी बहुउद्देशीय सामाजिक विकास संस्था व परिवर्तन समूहाच्या वतीने रविवारी सकल दिगंबर जैन वधू-वर परिचय मेळावा घेण्यात आला. सावंगी येथील मंगल कार्यालयात राज्यातून नव्हे तर परराज्यातून वधू-वर त्यांचे पालक, नातेवाईकही हजर होते. मेळाव्यात उद्योजक संजय रणदिवे, खंडेलवाल दिगंबर जैन पंचायतचे अध्यक्ष महावीर पाटणी, सैतवाल दिगंबर जैन समाजाचे अध्यक्ष अमोल मोगले, अग्रवाल दिगंबर जैन समाजाचे अध्यक्ष मुकेश साहुजी तसेच अतुल शाह, सुरेंद्र (अप्पु )चंद्रकुमार पाटणी यांच्यासह, श्री. भरत धोंगडे, सौ. सपना मोगले, सौ. रश्मी पाटणी, श्री.प्रकाश सांगवे,श्री.प्रीतम देशमाने, श्री. भरत देवधरे, डॉ. शैलेश चांदीवाल, संतोष पापडीवाल, रितेश ठोले, सचिन लोहाडे, प्रो. मनोज कासलीवाल, शरद कासलीवाल, शितल गंगवाल, ॲड. राकेश पाटोदी, प्रो. प्रकाश पापडीवाल, डॉ. रविंद्र कासलीवाल हे या सोहळ्याचे साक्षीदार ठरले. विवाह इच्छुकांनी नात्यातील समंजसपणा, आदर, अनुरूपता हेच महत्त्वाचे घटक जैन समाजातील नव्या पिढीची जोडीदाराविषयीची अपेक्षा बदलत असली तरी नात्यातील समंजसपणा, आदर आणि अनुरूपता हेच महत्त्वाचे घटक असल्याचे या मेळाव्यातून अधोरेखित झाले. १५० तरुणी, ३५० तरुणांचा सहभाग वधू-वर परिचय मेळाव्यात सकल ? दिगंबर जैन समाजातील ७०० जणांनी नोंद केली होती. त्यातील ५०० जण सहभागी झाले. त्यात १५० तरुणी व ३५० तरुणांचा समावेश होता, तसेच त्यांचे पालक, असे सुमारे ४ हजार जण सहभागी झाले. गत वर्षी ९८ विवाह जमले होतेअसे सुरेंद्र पाटणी, अध्यक्ष, वधू-वर परिचय मेळावा यानि कळवले. व्यासपीठावर निमंत्रित करताच आत्मविश्वासाने आपला परिचय व अपेक्षा व्यक्त केल्या. सूत्रसंचालन सागर पंडित, रूपाली रावका यांनी केले.

संपूर्ण कार्यकम यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शक डॉ.प्रकाश पापडीवाल, अशोक वायकोस, चंद्रकुमार पाटणी, संतोष पापडीवाल, जीवन अन्नदाते, मेळावा संस्थापक अध्यक्ष भरत धोंगडे, उपाध्यक्ष, सपना मोगले, सचिव प्रकाश संगवे, अध्यक्ष सुरेंद्र अप्पु पाटणी, तसेच कार्याध्यक्ष राकेश पाटोदी, सचिव भरत देवधरे, शैलेश चांदीवाल, कार्याध्यक्ष संजय महाजन, महावीर संगवे, सहकोषाध्यक्ष शितल गंगवाल, उपाध्यक्ष रितेश ठोलीया,राजेंद्र धोगडे, सचिव लोहाडे, प्रकाश धुमाळे, कोषाध्यक्ष सागर पंडीत, उपाध्यक्ष प्रितम देशमाने, सहकोषाध्यक्ष शरद कासलीवाल, सहसचिव मनोज कासलीवाल गणेश धोंगडे, कोषाध्यक्ष आर एच कासलीवाल, सहसचिव चिंतामण गवळी, स्वप्नील सोनटक्के, शंकर खुळे, श्रेयांस देशमाने, अभिजीत गोधा, स्वप्नील भोसेकर, संदिप गोसावी यांच्यासह महिला कार्यकारणी सपना मागेले, रश्मी पाटणी, रफ्तीका पाटोदी, स्वाती धोगडे, अलकाबाई जैन, सुनंदा धोगडे, स्वती कासलीवाल,रश्मी गंगवाल, छायाबाई संगवे, प्रियंका लोहाडे, दर्शना चांदीवाल, वैशाली धोगडे,पदमाबाई धोगडे, डॉ.डी.आर.कासलीवाल,संध्या गोसावी, मिना पापडीवाल, नंदना डेरे, अश्विनी देशमाने, अर्चना जैन, सपना जैन, सुप्रिया गोसावी, शितल गोसावी, लता पापडीवाल, ज्योती कासलीवाल, पायल गोधा, पुनम संगवे यानी परीश्रम केले अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली आहे.

# ‘हर मास-एक उपवास’चा शंखनाद संतांकडून तप, त्याग आणि उपवासाच्या गौरवगाथेचे गुणगान



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

**जैन जगताचे तेजस्वी तपस्वी संत अंतर्मना आचार्य प्रसन्न सागर महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत जगभरातील हजारो गुरुभक्ताची हजेरी**

भारत मंडपम येथे आयोजित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय जनमंगल परिषदेत ‘हर मास-एक उपवास‘ (दर महिन्याला एक उपवास) या अभियानाचा शंखनाद करण्यात आला. याप्रसंगी जैन जगताचे तेजस्वी तपस्वी संत अंतर्मना आचार्य प्रसन्न सागर जी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत योग गुरु बाबा रामदेव जी, लोकसभा अध्यक्ष श्री ओम बिरला जी, पर्यावरण मंत्री श्री भूपेंद्र यादव जी, आचार्य बालकृष्ण जी, पीठाधीश्वर बाबा बालकनाथ योगी जी, जैन संत लोकेश मुनि जी, इंडिया टीव्हीचे चेअरमन श्री रजत शर्मा, डॉ. एस. के. सरीन, डॉ. अनुराग वारने, भारतीय शिक्षण बोर्डाचे चेअरमन एन. पी. सिंह यांच्यासह अनेक संत, विद्वान आणि लोकप्रतिनिधी सहभागी झाले होते.

आचार्य प्रसन्न सागर जी महाराज यांनी आपल्या ओजस्वी भाषणात उपवासाचे महत्त्व विशद करताना सांगितले की, ‘उपवास हा केवळ शरीराचा नाही, तर मन आणि आत्म्याचा आधार आहे. उपवास तो वैद्य आहे जो तन आणि मन या दोघांनाही निरोगी बनवतो. हा आत्मविश्वासाचा उत्सव आहे.‘ त्यांनी जगातील १४० कोटी जनतेने एक दिवस उपवास केल्यास ७ लाख टन अन्नाची बचत होऊ शकते, असे स्पष्ट केले. उपवास हे संकल्प, अनुशासन आणि आत्मबलाचे प्रतीक असल्याचे सांगत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे उदाहरण दिले. योग गुरु बाबा रामदेव जी यांनी आचार्य श्रींच्या तपाचे गुणगान करताना म्हटले की, ‘आचार्य प्रसन्न सागर जी यांनी केवळ उपवासाचा संदेश दिला नाही, तर तो आपल्या जीवनात जगून दाखवला आहे. जैन संतांच्या परंपरेतील तप, त्याग आणि अनुशासन भारताला आत्मबल आणि आत्मनिर्भरतेकडे घेऊन जाईल.‘ इंडिया टीव्हीचे चेअरमन श्री रजत शर्मा यांनी, आचार्य श्रींचे तप आजच्या जगात कोणत्याही चमत्कारापेक्षा कमी नसल्याचे सांगत, उपवास म्हणजे मन, वाणी आणि क्रोधावर संयम ठेवण्याचा संकल्प असल्याचे मत व्यक्त केले.

पर्यावरण मंत्री श्री भूपेंद्र यादव जी यांनी ५०० हून अधिक दिवस उपवास केलेल्या तपस्वीला (आचार्य श्रींना) पाहण्याचे सौभाग्य मिळाल्याचे सांगितले. ‘मन शुद्ध झाले, की पर्यावरण आपोआप सुधारेल,‘ असे त्यांनी नमूद केले. डॉ. एस. के. सरीन यांनी ‘हर मास-एक उपवास‘ हा प्रत्येक कुटुंबाचा संस्कार बनवण्यासाठी उपवासाचे शिक्षण लहानपणापासूनच सुरू करण्याची गरज व्यक्त केली. लोकसभा अध्यक्ष श्री ओम बिरला जी यांनी **‘हर मास-एक उपवास‘**चा संकल्प करत आचार्य श्रींच्या त्याग आणि तपाचे कौतुक केले. या अभियानाचा उद्देश प्रत्येक व्यक्तीला महिन्यातून किमान एक दिवस उपवास करण्यास प्रेरित करणे हा आहे, जेणेकरून तन, मन आणि समाज या तिन्ही स्तरांवर शुद्धीचे वातावरण निर्माण होईल. याप्रसंगी गुरुदेव यांच्या 'अष्टापद यात्रा' या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. अशी माहिती नरेंद्र अजमेरा अभीजीत हिरप पियुष कासलीवाल यानी दिली

# ग्रामविकासाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा - विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

## विभागीय आयुक्तांचा गावातील नागरिकांशी ई ग्रामसंवाद - एक दिवस' उपक्रमांतर्गत थेट संवाद

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

गावातील पाणीपुरवठा योजना, पाणंद रस्ते, अंगणवाडी व शाळा इमारती, स्मशानभूमी, घरकुल तसेच सौर ऊर्जेच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत नागरिकांच्या अडचणी तत्काळ सोडवाव्यात. ग्रामविकास प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून प्रशासकीय यंत्रणांनी ग्रामविकासाच्या योजनांची प्रभावी व वेळेत अंमलबजावणी करावी, असे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.

विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी छत्रपती संभाजीनगर विभागातील आठ जिल्ह्यांतील निवडक गावांमधील नागरिकांशी 'ई ग्रामसंवाद - एक दिवस' उपक्रमांतर्गत ऑनलाईन वेबिनारद्वारे थेट संवाद साधला. या वेळी अपर आयुक्त मंजुषा मिसकर, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, सहायक आयुक्त ज्ञानोबा मोकाटे उपस्थित होते. संवादात संबंधित गावांतील सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

श्री. पापळकर म्हणाले की, गावातील पाणीटंचाईच्या नियोजनात पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य देणे आवश्यक आहे. नागरिकांनी मांडलेल्या अडचणी तत्काळ सोडवून त्यामध्ये कोणताही विलंब होणार नाही, याची दक्षता गावपातळीवरील प्रशासकीय यंत्रणांनी घ्यावी. जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजना, महिला बचत गटांचे सक्षमीकरण, अंगणवाडी सुविधा तसेच प्रत्येक गावात सुविधायुक्त स्मशानभूमी उपलब्ध असणे गरजेचे आहे. ज्या गावांमध्ये या सुविधा उपलब्ध नाहीत, तेथे लोकप्रतिनिधी व प्रशासनाने समन्वयाने तातडीने पाठपुरावा करावा.

गावात एकही कुटुंब बेघर राहणार नाही, यादृष्टीने प्रशासनाने नियोजन करावे, असे स्पष्ट निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. संवादादरम्यान बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील नफरवाडी, परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील हादगाव, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील करोडी तसेच लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील नागरिकांनी त्यांच्या गावांतील विविध समस्या मांडल्या. विभागीय आयुक्तांनी संबंधित प्रशासनाला या अडचणी तत्परतेने सोडवून त्याबाबतचा अहवाल विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश दिले.

छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्यांतील नागरिकांनी या संवादात सहभाग नोंदविला. दर पंधरवाड्याला प्रत्येक जिल्यायातून एक गाव निवडून तेथील नागरिकांशी थेट हा संवाद साधला जाणार आहे. या उपक्रमामुळे गावातील प्रश्न समजण्यास मदत होते. योजनांचाही आढावा प्रभावी ठरतो.

# मनुष्याने भयभीत न होता ,धैर्याने संकटांवर मात करावी - उपाध्याय विरंजनसागरजी महाराज

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

श्री १००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी (जटवाडा) येथे आज दरवर्षी प्रमाणे भगवान पार्श्वनाथांच्या २८०१ व्या जन्मकल्याण दिना च्या निमीत्ताने वार्षिक यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रा महोत्सवात उपाध्याय विरंजनसागरजी महाराज, विसौम्यसागरजी महाराज, विशीलाश्री माताजी ससंघाची प्रमुख उपस्थिती होती. संपुर्ण यात्रा महोत्सव त्यांच्या सानिध्यात संपन्न झाले. महाप्रसादाचे आयोजन चंद्रकलाबाई फुलचंदसा साहुजी, किरणदेवी जितेंद्र, शिवानी साहुजी परिवार छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले होते. सकाळी १० वाजता मिनादेवी डॉ.अशोक प्रिया सागर ठोले परिवार लासुर स्टेशन यांच्या हस्ते धर्मध्वजारोहन करुन यात्रा महोत्सव प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर श्री क्षेत्रावरिल मानस्तंभाचे आणि मुलनायक संकटहर पार्श्वनाथ भगवंतांच्या प्रतीमेचे पंचामृत अभिषेक करण्याचे सौभाग्य इंद्र इंद्रानी संगीता भरतकुमार डोंगरे, पायल सुमित डोंगरे परिवार यांना मिळाला तर शांतीमंत्राचा मान विक्रमकुमार नेमीनाथसा साहुजी, ईश्वरलाल अनिलकुमार सुनिलकुमार बाकलीवाल परिवार, विनीत लोहाडे, प्रमोद पांडे, अशोक गंगवाल, दिलीप सेठी, मुकेश साहुजी यांना मिळाला, कार्यकमाचे सुत्रसंचालन अध्यक्ष विनीत लोहाडे अशोक गंगवाल यांनी केले तर प्रास्तविक क्षेत्राचे महामंत्री प्रमोद पांडे यांनी केले.

संपुर्ण अभिषेक विधान संगीतकार शैलेश - वैशाली पहाडे व नमोकार भक्तीमंडळ यांच्या संगीत निर्देशनात संपन्न झाला. उपस्थित समाज बांधवांना उपाध्याय विरंजनसागरजी महाराज उदबोधन करतांना म्हणाले की, भगवान पार्श्वनाथांवर अनेक उपसर्ग झाले तरी त्यांनी ते उपसर्ग शांतपणे सहन केले तसेच मनुष्यावर सुध्दा संकटे आली तर त्यांनी घाबरुन न जाता खर्या मनुष्य धर्मा जानीव ठेवुन धैर्यपुर्वक त्याचा सामना करून आपले जीवन व्यतीत करत रहावे व भगवंताच्या जन्मजयंती विषयी म्हणाले की भगवंताचा जन्म हा पुन्हा होत नाही परंतु मनुष्याचा जन्म हा पुन्हा पुन्हा होतो म्हणुन तिर्थकंर भगवंताच्या जन्मकल्याणक महोत्सव आपण भक्तीभावाने साजरा करतो.

# बौद्धिक संपदा हक्क, यांचे जागतिक अर्थ व्यवस्थेत अनन्य साधारण स्थान- डॉ विवेक गिते

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**



दिनांक १५ डिसेंबर २०२५ प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान आणि मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर व लालबहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद रसायनशास्त्र विभाग आयोजित एक दिवसीय समाज, संशोधन, आणि बौद्धिक संपदा हक्क या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेचे उद्धाटन महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. श्री. विवेक जैस्वाल यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे आणि बीजभाषक डॉ. विवेक गिते (बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव), कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून देवगिरी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. रवी पाटील हे होते. उपप्राचार्य डॉ. अपर्णा तावरे, डॉ. गणेश मोहिते व कार्यशाळा समन्वयक डॉ. रजिता इंगळे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या उदघाटनपर भाषणात श्री. विवेक जैस्वाल यांनी विज्ञान आणि भारतीय परंपरागत ज्ञान, कौशल्य यावर संशोधन झाले पाहिजे असे मत व्यक्त केले. आपल्या बीजभाषणात डॉ. गिते यांनी शाश्वत विकासासाठी संशोधन आणि नवकल्पना या माध्यमातून विकास झाला पाहिजे. आर्थिक मूल्य संवर्धणासाठी बौद्धिक संपदा हक्क यांचे महत्व अनन्यसाधारण आहे तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या नवकल्पना मांडल्या पाहिजेत त्यानुसार छोटे उद्योग विद्यार्थ्यांनी सुरु करणे अपेक्षित आहे, असे प्रतिपादन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवि पाटील म्हणाले बौद्धिक संपदा हक्क, बौद्धिक संपदा नोंदी ही काळाची गरज आहे. ज्यांनी कधी ही औपचारिक शिक्षण घेतले नाही त्यांनी समाज उपयुक्त संशोधन कृषीक्षेत्रात केले आहे. कालांतराने त्यांच्या बौद्धिक संपदेची नोंद घेण्यात आली. महाविद्यालय, विद्यापीठातील इन्क्युबेशन सेंटर च्या माध्यमातून विद्यार्थ्यानी आपल्या नवकल्पना साक्षात आणल्या पाहिजेत हे विचार मांडले. दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेत डॉ. अर्चना असतकर यांनी पेटेन्ट नोंदी आणि प्रकाशन यांसबंधी मार्गदर्शन केले तर प्रतीक मुनोत यांनी 'बौद्धिक संपदा नोंदी पद्धत, आणि विज्ञान नवकल्पना' यामधील संधी या विषयावर माहिती दिली. बौद्धिक संपदा हक्क संरक्षण आणि भारतीय कायदा याविषयीं डॉ. आनंद देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रजिता इंगळे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. दत्तात्रय पानसरे यांनी केले. या कार्यशाळेत डॉ. सुनील टेकाळे, डॉ. अजित धस, डॉ. सतीश देशमुख, डॉ. आनंद धीरबस्सी, डॉ. अनंत कनगरे यांच्यासह ३०० प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी यांनी आपला सक्रिय सहभाग नोंदवला.

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नागरिकांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष

# गरवारे हाय-टेक फिल्म लिमिटेडकडून विषारी पाणी व वायू प्रदूषणाचा कहर



## नायगाव बकवालनगरच्या नागरिकांचे जीवन उद्ध्वस्त; न्यायासाठी साईनाथ पेहेरकर यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यातील नायगाव बकवालनगर येथे गरवारे हाय-टेक फिल्म लिमिटेड या कंपनीकडून होत असलेल्या भीषण पाणी व वायू प्रदूषणामुळे संपूर्ण गावाचे जीवनच धोक्यात आले आहे. हजारडेस वेस्टेज केमिकलयुक्त व ऍसिडयुक्त पाणी थेट जमिनीत सोडून कंपनी नागरिकांच्या आरोग्याशी आणि शेतीशी उघडपणे खेळत असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. कंपनीपासून अवघ्या १०० फूट अंतरावर मोठी नागरी वसाहत असतानाही प्रदूषण नियमांना पायदळी तुडवत ही कंपनी बेधडकपणे कारभार करत असल्याचा आरोप आहे. गावातील विहिरी व बोअरवेलमधून येणारे पाणी पूर्णतः विषारी बनले असून त्यातून तीव्र दुर्गंधी येत आहे. हेच पाणी पिण्यास, स्वयंपाकास व शेतीसाठी वापरण्याची वेळ नागरिकांवर आली असून परिणामी त्वचारोग, श्वसनविकार आणि कॅन्सरसारख्या प्राणघातक आजारांचे



प्रमाण धोकादायकरीत्या वाढले आहे. या विषारी पाण्याचा वापर शेतीसाठी केल्याने शेकडो एकरवरील पिके जळून नष्ट झाली असून शेतकरी आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त झाले आहेत. उपोषणकर्ते साईनाथ रावसाहेब पेहेरकर यांनी सांगितले की, एका संपूर्ण शेती हंगामात केमिकलयुक्त पाणी वापरल्यामुळे सर्व पीक वाया गेले. याबाबत नुकसानभरपाईची नोटीस देऊनही कंपनी प्रशासनाने अक्षरशः कानाडोळा केला आहे. याशिवाय कंपनी परिसरात मोठ्या प्रमाणावर वेस्टेज प्लास्टिक जाळले जात असल्याने परिसरात विषारी धुराचे ढग पसरले असून नागरिकांना श्वास घेणेही कठीण झाले आहे. लहान मुले, वृद्ध व महिला सर्वाधिक बाधित होत असून अनेकांना कायम स्वरूपी श्वसनाचे आजार जडले आहेत. हे सर्व घडत असताना प्रदूषण नियंत्रण यंत्रणा व प्रशासन मात्र गप्प का आहेत, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

२५ नोव्हेंबर २०२५ रोजी कंपनी व प्रशासनाला नोटीस दिल्यानंतरही कोणतीही कारवाई न झाल्याने अखेर नायगाव बकवालनगर व परिसरातील नागरिकांच्या वतीने साईनाथ रावसाहेब पेहेरकर यांनी १८ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. हे उपोषण केवळ एका व्यक्तीचे नसून संपूर्ण गावाच्या अस्तित्वासाठीचे आंदोलन असल्याचे सुमेध गायकवाड यांनी स्पष्ट केले आहे.

नागरिकांची ठाम मागणी आहे की, गरवारे हाय-टेक फिल्म लिमिटेड कंपनी तात्काळ बंद करण्यात यावी किंवा नागरी वसाहतीपासून दूर स्थलांतरित करण्यात यावे. तसेच दूषित पाणी व वायू प्रदूषणामुळे आजारग्रस्त झालेल्या नागरिकांना व शेती उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना कंपनीने भरघोस नुकसानभरपाई द्यावी. अन्यथा हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप न केल्यास भविष्यात होणाऱ्या गंभीर परिणामांची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंपनी व यंत्रणांची राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199